**Our Ten students as Agniveer!**

# नूतन मराठाचे दहा विद्यार्थी झाले अग्निवीर

## पालकांसह विद्यार्थ्यांचा महाविद्यालयाने केला सत्कार; देशसेवेची मिळाली संधी

प्रतिनिधी | जळगाव

नूतन मराठा महाविद्यालयातील दहा विद्यार्थ्यांची भारतीय सैन्यदलात अग्निवीर म्हणून निवड झाली. त्यांच्या या निवडीबद्दल पालकांसह भावपूर्ण सत्कार आयोजित करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून कमांडिंग ऑफिसर अभिजित महाजन, अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एल. पी. देशमुख होते. प्रस्तावनेत एनसीसी प्रमुख लेफ्टनंट शिवराज पाटील यांनी महाविद्यालयातील एनसीसी युनिटच्या वाटचालीची माहिती दिली.

तरुणांना देशसेवेत जाण्यासाठी प्रोत्साहन दिले गेले पाहिजे. तरुणांची देशसेवेला निवड होणे म्हणजे पालकांचा हा सत्कार असतो. नूतन मराठातील अनेक एनसीसी कॅडेट सैन्यात गेलेले आहे. विद्यार्थ्यांच्या यशात गुरुजनांची देखील महत्त्वाची भूमिका आहे असे अभिजित महाजन यांनी येथे नमूद केले.




अग्निवीर म्हणून निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्यासाठी उपस्थित मान्यवर.

**निवड झालेले विद्यार्थी :** वैभव पाटील ( नेव्ही ), गौतम धाडी ( अग्निवीर २ जबलपूर ), नीरज मोरे ( अग्निवीर-बिहार रेजिमेंट ), किरण साळुंखे ( अग्निवीर जाट रेजिमेंट ), रमेश सपकाळे ( अग्निवीर आयटीबीपी ), वैभव शेळके ( अग्निवीर बीइजी सेंटर, पुणे ), रोहित बारी ( अग्निवीर, गेनोडियन रेजिमेंट ), तेजस पाटील ( अग्निवीर सिग्नल रेजिमेंट ), पवन पाटील ( अग्निवीर पुणे ), सोनाली पाटील ( बीएसएफ ).